2018-19

ISSN 2231-6671

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# Hi-TECH RESEARCH ANALYSIS

2018-19


IMPACT FACTOR 4.95

ISSN 2231-6671

*International Registered & Recognized*

*Research Journal Related to Higher Education for all Subjects*


# Hi-TECH

# RESEARCH ANALYSIS

**UGC APPROVED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL**


Issue : XVI, Vol. - I

Year - VIII, (Half Yearly)

Aug. 2018 To Jan. 2019

**Editorial Office :**

'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact :** 02382 - 241913
09423346913 / 09503814000
07276305000/ 09637935252

**Website**

www.irasg.com

**E-mail :**

interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Published by :**

JYOTICHANDRA PUBLICATION

Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

**Price : ₹ 200/-**



**CHIEF EDITOR**

**Dr. Balaji G. Kamble**
Research Guide & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya,
Latur, Dist. Latur.(M.S.) (Mob. 09423346913)

**EXECUTIVE EDITORS**

**Dr. Sunanda Rodge**
Principal
Govt. B.Ed. College,
Nanded, Dist. Nanded (M.S)

**Scott. A. Venezia**
Director, School of Business,
Ensenada Campus,
California, (U.S.A.)

**Dr. Omshiva V. Ligade**
Head, Dept. of History
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**Bhujang R. Bobade**
Director Manuscript Dept.,
D. A. & C. Research Insititute,

**Dr. Dileep S. Arjune**
Professor & Head, Dept. of Economics
J. E. S. College,
Jalna, Dist. Jalna(M.S.)

**Dr. U. Takataka Mine**
Tokiyo (Japan)

**Dr. Babasaheb M. Gore**
Dean- Faculty of Education & M.C.
Member,S.R.T.M.U, Nanded.(M.S.)

**Dr. Nilam Chhanghani**
Dept. of Economics,
KNG Mahavidyalaya
Karanja Lad, Dist. Washim (M.S.)

**DEPUTY-EDITOR**

**Dr. G . V. Menkudale**
Dept. of Dairy Science,
Mahatma Basweshwar College,
Latur, Dist. Latur.(M.S.)

**Dr. C.J. Kadam**
Head, Dept. of Physics,
Maharashtra Mahavidyalaya,
Nilanga, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Balaji S. Bhure**
Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Bharat S. Handibag**
Dean, Faculty of Arts,
Dr. B.A.M.U. Aurangabad(M.S).

**Dr. S.B. Wadekar**
Dept. of Dairy Science,
Adarsh College,
Hingoli, Dist. Hingoli.(M.S.)

**Dr. Shivaji Vaidya**
Dept. of Hindi,
B. Raghunath College,
Parbhani , Dist. Parbhani.(M.S.)

**CO-EDITORS**

**Dr. R.N. Salve**
Head, Dept. of Sociology,
Shivaji University,
Kolhapur, Dist. Kolhapur.(M.S.)

**Ghansham S. Baviskar**
Dept. of English,
RNC & NSC College,

**Dr. Kailash Tombare**
Head, Dept. of Economics,
Devgiri Mahavidyalaya,
Aurangabad.(M.S.)

**Dr. Kailash R. Nagulkar**
Head, Dept. of History,
Gulab Nabi Azad College,
Barshi Takli, Dist. Akola.(M.S.)

Issue : XVI, Vol. I
Hi-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 4.95
ISSN 2231- 6671
Aug. 2018 To Jan. 2019

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Customer Attitude, Prefrence and Satisfaction Towards Investment in Iciciprudential Life Insurance Co. Ltd. **Deepak Kumar Gupta, Dr. Vinod Khapne** | 1 |
| 2 | Evolution Of Urban Co-Operative Banks In India And Their Current Status **Jagdish S. Walawalkar, Dr. Subhash D. Pawar** | 7 |
| 3 | Cost Effectiveness of HRM in Small and Medium Industries **Dr.V. R. Gavhale** | 15 |
| 4 | Women Entreprenurship In India Problems & Suggestion **Kalpana K. Kendre** | 24 |
| 5 | A Study Of Rural Consumer Behaviour Of Patanjali Products With Reference To Ajara, Chandagad And Gadhiglaj Talukas In Kolhapur District **Ram D. Madhale** | 29 |
| ६ | मत्सव्यवसाय ऐतिहासिक पार्श्वभूमी व महत्व **डॉ. राजेंद्र रामराव गव्हाळे** | 39 |
| 7 | वाहतूकीचा इतिहास व महत्व **डॉ. आर. बी. भांडवलकर** | 45 |
| 8 | क्षयरोग, आयोडीन न्युनता,किटकजन्य,कर्करोग नियंत्रण कार्यक्रम **दिलीप पांडुरंग महाजन** | 52 |
| 9 | गांधी विचार आणि आधुनिक जग **डॉ. व्ही. आर. कोडापे** | 59 |

Issue - XVI, Vol. I
HI-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 4.95
ISSN 2231- 6671
Aug. 2018 To Jan. 2019


8

# क्षयरोग, आयोडीन न्युनता,किटकजन्य,कर्करोग नियंत्रण कार्यक्रम

दिलीप पांडुरंग महाजन
चिखली, जि. बुलढाणा

## Research Paper - Economics

**प्रस्तावना**

क्षयरोग हा मायक्रोबक्टेरियम नावाच्या जिवाणामुळे होतो. हा आजार फार पूर्वीपासून माहीत असून प्राचीन काळी त्याला राजयक्ष्मा या नावाने संबोधले जायचे. क्षयरोग प्रामुख्याने फुफुसांना होत असला तरी तो शरीराच्या लसीग्रंथी, मेंदू, हाडे, मूत्रपिंड, यासारख्या अवयवानांसुध्दा होऊ शकतो. क्षयरोगाचा प्रसार हवेद्वारे होतो. जेव्हा फुफ्फुसाच्या क्षयरोगाने आजारी असणारी व्यक्ति शिंकते किंवा खोकते तेव्हा क्षयरोगाच्या जिवाणूंचा प्रासार होतो.

क्षयरोग ही अजूनही सार्वजनिक आरोग्याची मोठी समस्या आहे. आपल्या देशात दररोज ८०० पेक्षा जास्त म्हणजेच दर तीन मिनिटाला तीन व्यक्तीचा मुत्यू क्षयरोगाने होतो. क्षयरोगामुळे होणाज्या मृत्यूचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे विशेष: सामाजिक आणि आर्थिक हानी होते. सन १९६२ पासून देशात राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तथापी त्यामध्ये उपचारावर ठेवलेल्या रुग्णापैकी केवळ तीस ते चाळीस टक्के रुग्णांना बरे करण्याइतके मर्यादित यश मिळाले. हे पाहता केंद्रे शासनाने सन १९९३ पासून काही निवडक पथदर्शीतत्त्वावर प्रत्यक्ष निरीक्षणाखाली अल्पमुदतीच्या सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांची सुरुवात केली. पथदर्शी प्रकल्पाच्या उत्साहवर्धक कामगिरीवरुन सन १९९८ पासून केंद्र शासनाने सुधारित राष्ट्रीय क्षयरोग कार्यक्रमाचा प्रसार करण्यात ठरविले.

**उद्देश व उद्दिष्ट्ये**

या कार्यक्रमाचा उद्देश क्षयरोग नियंत्रणाखाली आणणे हा असून प्रती लाख लोकसंख्येमागे

१ पेक्षा कमी क्षयरोगाचे प्रमाण (prevalence) आल्यास क्षयरोग नियंत्रणाखाली आला असे म्हणता येईल. सध्या स्थितीत क्षयरोगाचे प्रमाण ४ प्रति लाख लोकसंख्या असे आहे.

उद्दिष्ट्ये - ९० टक्के नवीन थुंकी क्षयरुग्णांना व ८५ टक्के पुनरुपचावरील क्षयरुग्णांना बरे करणे आणि हा दर कायम राखणे अपेक्षित नवीन थुंकी दूषित रुग्णांपैकी किमान ९० टक्के थुंकी दूषित रुग्ण शोधने आणि हा दर कायम राखणे.

? ड्रग रेजिस्टंट क्षयरुग्णांचे बरे होण्याचे प्रमाण वाढविणे.

? एचआयव्ही बाधित क्षयरुग्णांचे लागण व मृत्यू प्रमाण कमी करणे.

? खाजगी क्षेत्रातील क्षयरोग सेवेची परिणामकारकता वाढविणे.

**अंमलबजावणी पध्दत**

? सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाचे पाच घटक.

? राजकीय आणि प्रशासकीय बांधलिकी.

? स्पुटम मायक्रोस्कोपीसह रोग निदानाची योग्य व अचूक पध्दती.

? रुग्णानिहाय खोक्यांमध्ये चांगल्या दर्जाच्या औषधांचा सातत्याने पुरवठा.

? पध्दतशीर संनियंत्रण व बांधिलकी.

**कार्यक्रमांची वैशिष्ट्ये**

? क्षय रोग सेवा देण्यासाठी इंटर नॅशनल दर्जाची मानके राज्यभरातील उपचार पथके डी. एम. सी. येथे वापरात येतात.

? थुंकी नमुना तपासणीसाठी शासकीय तसेच खाजगी डी. एम. सी. ना मान्यता.

? औषधांची सहज उपलब्धता देण्यासाठी २ कि.मी. अंतराच्या आत DOT CENTRE उपलब्ध DOTS उपचार मोफत देण्यात येतात.

? टी.बी., एचआय. व्ही. Collaboration प्रभावी होण्यासाठी राज्य, जिल्हा स्तरावर mechanism सर्व समावेशक अहवाल सादरीकरण पध्दत राबविण्यात येते तसचे कार्यक्रमाचा नियमित आढावा व मूल्यमापन केले जाते.

**अंमलबजावणी पध्दती**

सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमामध्ये पुढील पाच घटकांचा समावेश होतो.

? राजकीय आणि प्रशासकीय बांधिलकी

? स्पुटम मायक्रोस्कोपीसह रोग निदानाची योग्य व अचूक पध्दती.

? रुग्णानिहाय खोक्यांमध्ये चांगल्या दर्जाच्या औषधांचा सातत्याने पुरवठा.

? प्रत्यक्ष निरीक्षणाखाली देण्यात येणारा औषधोपचार.

? पध्दतशीर संनियंत्रण बांधिलकी.

**राष्ट्रीय आयोडिन न्युनता विकार नियंत्रण कार्यक्रम**

भारत सरकारने गलगंड या कार्यक्रमाचे नाव १९९२ नंतर आयोडिन न्युनता विकार नियंत्रण कार्यक्रम असे ठेवले आहे. आयोडिन हे महत्त्वाचे सुक्ष्म घटक आहे व ते थायरांईट हार्मोन तयार करणे कामी आवश्यक आहे.

रोज १५० मायक्रोग्रॅम ची शरीराला गरज असते. आयोडिन हे पाणी, मासे, समुद्रातील अन्नामध्ये मिळते. आयोडिनचे प्रमाण हे पर्वताजवळ, पर्वतावरुन येणाऱ्या पाण्यात कमी प्रमाणात असते.

**आयोडिन कमी झाल्यामुळे खालील विकार संभवतात**

१. गलगंड
२. शारिरीक व मानसिक वाढ कमी होणे.
३. उंची कमी होणे.
४. उंची जास्त होणे.
५. गर्भपात होणे सारखे आजार उद्‌भवतात.

**महाराष्ट्र राज्यातील कार्यक्रमाची रुपरेषा**

महाराष्ट्र राज्यात गलगंड हा कार्यक्रम मध्यवर्ती समितीच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे खालील हेतूने दिला आहे.

- गलगंड सर्वेक्षण करणे.
- आयोडिनयुक्त मिठाची निर्मिती करणे.
- आयोडिन मिठाचा वापर करणे.
- साधे मिठ वापरण्यावर बंदी आणणे (निवडक जिल्ह्याचे)
- मिठामधील आयोडिनची मात्रा तपासणे.
- आयोडिनयुक्त मिठाच्या वापरासाठी आरोग्य शिक्षण देणे.
- आयोडिनयुक्त मिठाचे पेकेटस नियमित आदिवासी भागात वाटप करणे.

**राज्यातील गलगंडाच्या सध्याची परिस्थिती**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनाप्रमाणे ३२ जिल्हे व ४ नवीन जिल्हे यांचा सर्व्हे झाला आहे. पहिल्या टप्प्यातील सर्वेक्षणामध्ये सर्व जिल्ह्याचे सर्वेक्षण केले आहे. महाराष्ट्र शासनाने राज्यात आर्थिक तरतुदीनुसार ५ सर्वेक्षण टीम तयार केल्या आहेत. त्या नागपूर, कोल्हापूर, औरंगाबाद, पुणे, नाशिक हे जिल्हे आहेत.

**कार्यक्रमाची उद्दिष्ट्ये**

**१. कार्यक्रम आखणे व सर्वेक्षण करणे.**

२. आयोडिन युक्त मिठाच्या वापराचे शिक्षण देणे.

३. मिठाचे नमुने तपासणे.

४. गलगंड रुग्णांना औषधोपचार व सल्ला देणे.

**राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम**

**ऐतिहासिक पार्श्वभूमी**

राष्ट्रीय किटकजन्य रोग कार्यक्रमातंर्गत समावेश असलेल्या रोगांपैकी राज्यात डासांमार्फत प्रसारीत होणाज्या हिवताप, हत्तीरोग, डेंगीताप, जॅपनिज एन्सेफीलायटीस, चिकनगुन्या व सॅन्डजफ्लायमार्फत प्रसारीत होणारा चंडीपूरा तसेच पिसवांमार्फत प्रसारित होणाज्या प्लेंग या रोगाचा नियंत्रणासाठी शासनास्तारावरुन उपाययोजना राबविण्यात येतात.

सन १९५३ पासून राज्यात हिवताप नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येतात. त्यातील प्रमुख टप्पे खालीलप्रमाणे.

१९५३ - राष्ट्रीय हिवताप नियंत्रण कार्यक्रम.

१९५८ - राष्ट्रीय निमुर्लन नियंत्रण कार्यक्रम.

१९७७ - सुधारित योजना.

१९७९ - बहुउद्देशिय आरोग्य सेवा.

१९९५ - हिवताप कृती योजना १९९५ नुसार हिवताप विरोधी उपाय योजनांची अंमलबजावणी.

१९९७ - जागतिक बँक अर्थसहाय्यित हिवताप नियंत्रण प्रकल्पाची १६ आादिवासी जिल्ह्यांमध्ये अंमलबजावणी.

१९९९ - राष्ट्रीय हिवताप प्रतिरोध कार्यक्रम.

२००४ - राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम.

२००६ - राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान.

**राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाचे ध्येय**

हिवताप, डेंगीताप, जें.ई. ने होणाज्या मृत्यूचे प्रमाण सन २०१२ पर्यंत ५० टक्के कमी करणे व रुग्णसंख्या नियंत्रणात ठेवणे. सन २०१५ पर्यंत बाह्यलक्षणेयुक्त हत्तीरोगाचे निमुर्लन करणे.

**सुधारित योजनेची उद्दिष्ट्ये**

? हिवताप रुग्णांचे प्रमाण कमी करणे.

? हिवतापाने होणारे मृत्यू टाळणे.

? औद्योगिक व शेतकी कार्यावर हिवतापाचा परिणाम होऊ न देणे.

? आतापर्यंत मिळविलेले यश टिकविणे.

**योजनेची कार्यपध्दती**

सहसंचालक, आरोग्य सेवा, (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग) पुणे हे राज्यस्तरावर कार्यक्रम प्रमुख आहेत. व ते योजनेवर नियंत्रण ठेवतात. सहसंचालक, आरोग्य सेवा, (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग) पुणे ६ यांना सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (हत्तीरोग) पुणे व राज्य किटकशास्त्रज्ञ सहाय्य करतात. त्याचप्रमाणे प्रोदशिक स्तरावर सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा, (हिवताप) व जिल्हास्तरावर जिल्हा हिवताप अधिकारी हे सहाय्य करतात.

**राष्ट्रीय कर्करोग मधुमेह व पक्षाघातप्रतिबंधक कार्यक्रम**

**पार्श्वभूमी**

असंसर्गजन्यरोग हे अतितीव्र म्हणुनसुध्दा ओळखले जातात. यात प्रामुख्याने हृदयरोग, मधुमेह, पक्षाघात, कर्करोग आणि अपघात यांचा समावेश होतो. या सर्व आजारांचे मुख्य कारण म्हणजे तम्बाखुचे सेवन, धुम्रपान, असमतोल आहर, मानसिक तणाव आणि दैनंदिन जिवनशैलितील बदल इ. असे समजण्यात येते की, भारतामध्ये सर्वसाधारणपणे मधुमेह, उच्चरक्तदाब, हृदरोग, पक्षाघात यांचे अनुक्रमे ६.२ टक्के, १५.९ टक्के, ३.७ टक्केआणि ०.१५ टक्के नुसार प्राबल्य आढळते. भारतामध्ये अंदाजे २५ लक्ष कर्करोगी आहेत. या असंसर्गजन्यरोगच्या वाढत्या प्रमाणामुळे आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांनी राष्ट्रिय कर्करोग, मधुमेह, हृदयरोग आणि पक्षाघात प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रम राबविण्यास सुरुवात केलेली आहे. याकरिता केंद्र शासनाकडून ८० टक्के तर राज्यशासनाकडून २० टकके अनुदान प्राप्त होणार आहे. महाराष्ट्रराज्यात हा कार्यक्रम अमरावती, गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, वर्धा आणि वाशिम या जिल्ह्यांमध्ये राबविला जात आहे.

**उद्दिष्ट्ये**

१. स्वभाव आणि जिवनशैलीतील बदलांच्या माध्यमातून सर्वसामान्य असंसर्गजन्य रोगांवर प्रतिबंध आणि नियंत्रण ठेवणे.

२. सर्वसामान्य असंसर्गजन्य रोगाचे निदान व उपचार लवकर होण्यासाठी सुविधा पुरविणे.

३. सर्वसामान्य असंसर्गजन्य रोगांचा प्रतिबंध, निदान आणि लवकर करण्यासाठी वेगवेगळ्या स्तरावरील आरोग्य यंत्रणेचे बाळकटीकारण करणे.

४. वाढत्या असंसर्गजन्य रोगांना आळा घालण्याकरिता आरोग्य संस्थामधील वैद्यकीय अधिकारी, पॅरामेडिकल स्टाफ, परीचारिका यांना प्रशिक्षण, देणे.

५. उपशामक आणि पुनर्वसनाच्या सेवा विकसित करणे.

**अंमलबजावणी पध्दती**

? वर्तनबदलामधुन प्रतिबंध

? लवकर निदान आणि उपचार

? क्षमतानिर्मिती, देखरेख, सनियंत्रण आणि मुल्यमापन

**उपक्रम**

**राज्यस्तरीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कक्ष**

आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई येथे राज्यस्तरीय असंसर्गजन्यरोगाची स्थापना करण्यात आलेली आहे. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन, अंमलबजावणी, नियंत्रण आणि मुल्यमापन करुन भौतिक आणि आर्थिक ध्येय गाठण्यासाठी जबाबदारी या कक्षाची आहे. हा कक्ष राज्य कार्यक्रम अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली कार्यरत राहील.

**जिल्हा असंसर्गजन्यरोग नियंत्रण कक्ष**

कार्यक्रम राबविल्या जाणाज्या जिल्ह्यांमध्ये जिल्हा मुख्यालयात जिल्हा असंसर्गजन्यरोग नियंत्रण कक्षाची स्थापना केली जाईल. जिल्ह्यामध्ये कार्यक्रमातंर्गत राबविल्या जाणाज्या विविध उपक्रमांचे नियोजन, अंमलबजावणी, नियंत्रण आणि मुल्यमापन करुन भौतिक आणि आर्थिक ध्येय गाठण्याची जबाबदारी या कक्षाची आहे.

**जिल्हा रुग्णालय**

१. कर्करोग, मधुमेह, उच्चरक्तदाब, हदयाचे आजार इ. लवकरात लवकर निदान

२. कॉर्डियाक इंन्झाईम, लिपीड प्रोफाईल, कोयाग्युलेशन पॅारामिट्र्स, ईसीजी, इको, व इतर जपासणया करणे.

३. ग्रामीण आरोग्य व प्राथमिक आरोग्य केंद्र येथून संदर्भित केलेल्या हायरिक्त रुग्णावंर उपचार करणे.

४. रुग्णांची वेळोवेळी विचारणाकरणे, वर्तन बदलासाठी आरोग्य विषयक जागृकता करणे.

५. कर्करोग रुग्णासाठी डे केअर सुविधा उपलब्ध करुन देणे.

**उपजिल्हा / ग्रामीण रुग्णालयस्तर**

ग्रामीण रुग्णालयात नियमित एन.सी.डी. क्लिनीक सुरु ठेवणे. रुग्णालयात येणाज्या सर्व ३० वर्षावरील व्यक्तींची डॉक्टर मार्फत एनसाडी क्लिनीकमध्ये तपासणी करावी. त्यात प्रामुख्याने तंबाखु, धुम्रपान व दारुचे सेवन याबाबत विचारणा व सर्वाचे ब्लड शुगर, रक्तदाब तपासणी, ईसीजी, ब्लड क्लोरेस्टॉल व आवश्यकतेनुसार सोनाग्राफी, एक्सरे याबाबत चाचण्या कराव्यात. मधुमेह, उच्च रक्तदाब व स्ट्रोक केसेसवर योग्य तो उपचार करावा.

**प्रआर्के आणि उपकेंद्र**

प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्तग उपकेंद्रातील ए.एन.एम. डब्लु यांनी सदर कार्यक्रमात जनजागृती करणे यात प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश होतो.

१) सकस आहार, नियमित व्यायाम.

२) तंबाखु, धुम्रपान व दारुचे सेवन टाळणे, मानसिक तणावातून मुक्तता

३) कर्करोगाच्या धोक्याच्या सुचना देणे.

## संदर्भ सूची :-

१. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१७-१८, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई. पृष्ठ क्र. १९०-१९९

२. संकेत स्थळ : www.maharashtra.gov.in.

३. https://arogya.maharashtra.gov.in/Health-Indiactor

४. https://arogya.maharashtra.gov.in/Diseasecontenct.aspx